# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२७३/२०१९ मधील नि.५ वरील आदेश

(दिपाली फाळके वि. शैलेश फाळके)

अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ ते ६ यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२, १८, १९, २० व २२ प्रमाणे मुळ अर्ज दाखल केला असून दरम्यानची पोटगी व संरक्षण आदेश मिळण्याकरिता कलम २३ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

## अर्जदार हिचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–

०२. अर्जदारचे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ हे अर्जदारचे पती व सामनेवाला क्र.२ व ३ सासू सासरे, सामनेवाला क्र.४ नणंद, सामनेवाला क्र.५ जाऊ, सामनेवाला क्र.६ नणंदेचा मुलगा आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक २०.०४.२०१८ रोजी मौजे माहुली, ता.खानापूर, जि.सांगली येथे हिंदू धर्म शास्त्र व रितीरीवाजाप्रमाणे झाला आहे. अर्जदार ही सासरी मौजे माहुली येथे नांदावयास गेल्यानंतर दिनांक २०.०४.२०१८ रोजी पासून एक महिना तिला सामनेवाला यांनी व्यवस्थित नांदविले. त्यानंतर माहे मे २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात सामानेवाला यांच्या सोबत पुणे येथे भुईटे चाळ, मानाजी बाग पहिली गल्ली, खडकी, पुणे येथे दीर, जाऊ, त्यांची मुले यांच्या सोबत सप्टेंबर २०१८ पर्यंत राहिली. तिथे सामनेवाला क्र.१ याने भांडण करुन हकलून दिले. माहेरी असताना अर्जदाराला सामनेवाला क्र.१ याने पुन्हा फोन करुन बोलवून घेतले व ती पुन्हा सामनेवाला क्र.१, त्यांचे आई–वडील, जाऊ, तिची दोन मुले, नंणदेचा थोरला मुलगा यांच्या समवेत नोव्हेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८ अखेर माहुली येथे राहिली. त्यानंतर पुन्हा खडकी, पुणे येथे सामनेवाला क्र.१, दीर, जाऊ, त्यांची मुले यांचेसोबत २० एप्रिल २०१९ अखेर राहिली. त्या कालावधील सामनेवाला क्र.१ अर्जदारसोबत वारंवार विनाकारण भांडणे काढून, शिवीगाळ करत असे. तसेच, सामनेवाला क्र.१ दारु पिऊन अर्जदारचा शारिरीक व मानसिक छळ करीत असे, चारित्र्यावर संशय घेत असे. जर तू कोर्टात गेलीस तर तुझ्या आई व भावास भोकसून जीवे मारण्याची धमकी देत

होते.

०३. अर्जदार हिला सामनेवाला हे माहेरुन हुंडा आणण्यासाठी वारंवार मानसिक व शारिरीक छळ करीत होते, तू हुंडा आण नाहीतर तुला नांदू देणार नाही. आमचेसोबत तू राहू नकोस, तू कुठेही जाऊन रहा असे म्हणून जाऊ सतत टोमणे मारत असे. नणंदेचा मुलगा अर्जदाराला चाकूचा धाक दाखवून आरडाओरडा करीत असे. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ यांना दारुचे व्यसन असल्याने स्त्रीधन कानातील दागिने व गळ्यातील गंठण सामनेवाला क्र.३ यांचेकडे दिले. सामनेवाला यांनी दिलेल्या त्रासामुळे अर्जदार ही आजारी पडली. त्यामुळे, अर्जदार हिला माहेरी जाणेस भाग पाडले. अर्जदार ही मे २०१९ पासून माहेरी तिच्या आईकडे मौजे घानवड, ता.खानापूर, जि.सांगली येथे राहणेस आहे.

०४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून तिची माहेरची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. सबब, सामनेवाला क्र.१ हा पुणे येथे मॉलमध्ये नोकरीस असून त्यास दरमहा २५०००/- पगार आहे. अर्जदार हिला सामनेवाला क्र.१ याच्या वैयक्तिक मिळकतीमधून व वडिलोपार्जित मिळकतीतून अन्न, वस्त्र व अन्य मूलभूत गोष्टींकरीता व खर्चाकरीता दरमहा रु.५,०००/-, घरखर्चाकरीता दरमहा रु.५,०००/- व इतर खर्चाकरीता दरमहा रुपये ३,०००/- अशी एकूण रुपये १३,०००/- अशी अंतरिम पोटगी देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती आहे. त्यामुळे, मूळ अर्ज गुणदोषावर चालून निर्णित होणेस बराच कालावधी लागणार असलेने अर्जदार हिने प्रस्तुत अर्जान्वये सामनेवाला/जाबदारांना तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार करणेपासून परावृत्त करणेबाबत तसेच दरम्यानची पोटगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

## सामनेवाला क्र.१ व ३ ते ६ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे-

०५. प्रस्तुत अर्जास व मुळ अर्जास सामनेवाला क्र.१ व ३ ते ६ यांनी नि.क्र.२३ वर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. सामनेवाला क्र.२ लक्ष्मण

दत्तात्रय फाळके हे दिनांक ०६.११.२०२० रोजी मौजे माहुली येथे मयत झाले आहेत. सामनेवाला क्र.१ व ३ ते ६ यांनी, अर्जदार ही लग्न झालेनंतर नांदावयास आली होती हे मान्य करुन उर्वरित सर्व कथने नाकारली आहेत. सामनेवाला यांचे म्हणणे आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ शैलेश लक्ष्मण फाळके यांचा विवाह दि.२०.०४.२०१८ रोजी झाला होता. तो विवाह विधीपूर्वक झालेला असून तो आजही अस्तित्वात आहे.

०६. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, लग्नानंतर अर्जदार ही माहुली येथे सासरी नांदावयास आली. त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा पुणे येथे कापड दुकानात कामगार म्हणून काम करीत असल्याने अर्जदार व सामनेवाला तेथे भाडयाने घेतलेल्या खोलीत राहण्यास गेले होते. त्याच ठिकाणी सामनेवाला क्र.१ यांचा थोरला भाऊ त्याच्या कुटुंबासोबत खालच्या खोलीमध्ये राहत होता. अर्जदार काही दिवस व्यवस्थीत राहिली. त्या नंतर सामनेवाला क्र.१ चे भावाचे लहान मुलीस कपडे, खाऊ घेण्याचे कारणांवरुन वारंवार भांडण तंटा करु लागली. तसेच, सदरची खोली सोडून स्वतंत्र खोली घेऊन राहणेची मागणी करु लागली. अर्जदार हिचा स्वभाव अत्यंत संशयी असलेने सामनेवाला क्र.१ ला दोन–तीन वेळा काम सोडावे लागले. त्यामुळे, खोली भाडे देणे मुश्कील झाले होते. सामनेवाला क्र.१ यांना वर नमूद दागिने गहाण ठेवून रक्कम उचलावी लागली होती.

०७. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, सन २०१८ चे गौरी–गणपतीचे वेळी सामनेवाला क्र.१ यास कामावरुन येणेस उशीर झाला असता अर्जदार हिने भांडणतंटा करणेस सुरुवात केली. शेजारील लोकांनी समजून सांगूनसुध्दा अर्जदार ही हट्टी व भांडखोर स्वभावाची असल्याने तिने कोणाचेही ऐकले नाही. अर्जदाराच्या या कृत्यास तिची आई खतपाणी घालत होती. अर्जदार ही तिच्या आईच्या ऐकण्यात असलेने तिच्या सांगणेप्रमाणे वागत होती. भांडणतंटा झालेनंतर अर्जदार हिने तिच्या आईला पुण्याला बोलवून घेतले. तिथे सामनेवाला व घरच्या लोकांनी अर्जदार हिला बराच समजावून सांगणेचा प्रयत्न केला. परंतु, काही न ऐकता अर्जदार तिच्या आई बरोबर माहेरी निघून गेली.

०८. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, तद्नंतर सामनेवाला क्र.१ व त्यांचे घरातील लोकांनी लग्नातील मध्यस्थ श्री.सुखदेव महापुरे यांना अर्जदार यांचे कृत्याबद्दल सांगितलेनंतर त्यांनी अर्जदार हिला समजावून सांगून सामनेवाला क्र.१ यांचेबरोबर सासरी माहुली येथे पाठविले. त्यानंतर दिवाळी निमित्त सामनेवाला क्र.१ हे अर्जदार यांना पुणे येथे घेऊन गेले. अर्जदार ही तेव्हा दोनच दिवस व्यवस्थीत नांदली व पूर्वीच्याच कारणावरुन भांडणतंटा करु लागली. सदरच्या त्रासामुळे कामधंदा सोडावा लागला.

०९. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ त्यांच्या भावासोबत श्रीनाथ मंदिर, माहुली येथे कार्यक्रमानिमित्त आलेले होते. त्यावेळेस अर्जदार दोन दिवस माहेरी राहून येते असे म्हणून तिच्या भावासोबत माहेरी निघून गेली. अर्जदार ही कोणतेही कारण नसताना स्वतःहून सामनेवाला क्र.१ यांचा त्याग करुन गेलेली आहे व आजतागायत माहेरीच राहत आहे. दरम्यानचे काळात जाबदाराचे कुटुंबियांनी व प्रतिष्ठीत लोकांनी अर्जदार व तिच्या आईची समजूत काढण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु, सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

१०. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, दिनांक १९.०९.२०१९ रोजी महिला समुपदेशन केंद्र विटा येथे जाबदारांविरुध्द खोटी तक्रार नोंदवलेने दिनांक २४.०९.२०१९ रोजी वर नमूद कार्यालयात हजर राहिले होते. तिथे गांवातील पोलीस पाटील व इतर लोकांनी अर्जदार हिला समजावून सांगितले. परंतु, पुण्यात वेगळे राहणेचे कारण पुढे करुन नांदणेस स्पष्टपणे नकार दिला. अर्जदार हिच्या विकृत स्वभावामुळे सामनेवाला क्र.१ व त्यांचे कुटुंबियांना बराच मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागला आहे. या त्रासामुळेच सामनेवाला क्र.२ हे ह्दय विकाराच्या झटक्याने मयत झाले, याचा कोणताही विचार न करता अर्जदार अद्याप नांदणेस न येता माहेरीच राहिली आहे. त्यामुळे, अर्जदार हिचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अन्वये दिलेला अर्ज व दरम्यानचे पोटगीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती सामनेवाला यांनी केलेली आहे.

११. अर्जदार व सामनेवाला यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन पुढील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यांची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | विचाराधीन बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हीने मागणी केल्याप्रमाणे सामनेवाला यांचेपासून संरक्षण आदेश मिळण्यास ती पात्र आहे काय ? | नाही. |
| २. | मूळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार ही सामनेवाला क्र.१ यांचेकडून रक्कम रुपये १३,०००/– इतकी दरम्यानची पोटगी व घरभाडे मिळणेस पात्र ठरते का? | अंशतः होकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### विचाराधीन बाब क्र.१ व २ बाबतः–

१२. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण मिळणेकरिता मूळ अर्ज दाखल केलेला आहे. सद्यस्थितीमध्ये अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे विभक्त राहतात. सामनेवाला यांच्या कथनाप्रमाणे त्यांना उभय पक्षकारांचा विवाह मान्य आहे. अर्जदार यांचा अर्ज, सामनेवाला यांनी सदर अर्जाचा दाखल केलेले म्हणणे व सर्व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाला यांनी परस्परविरोधी तक्रारी केलेल्या आहेत. सामनेवाला यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही कोणतेही कारण नसताना स्वतःहून घर सोडून तिचे माहेरी निघून गेलेली आहे.

१३. प्रस्तुतचा कायदा हा स्त्रियांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आलेला आहे. भारतीय संस्कृतीनुसार विवाहानंतर पत्नीच्या उपजिवीकेची सोय करण्याची संपूर्ण

जबाबदारी ही पतीची असते. उभय पक्षकार जे एकमेकांवर आरोप करत आहेत त्याबाबत पुरावा येणे बाकी आहे. सामनेवाला यांनी एकमेकांच्या समजुतीने व ठरवून विवाह केलेला असल्यामुळे आज कोणत्याही कारणाने अर्जदार ही सामनेवाला यांचेपासून विभक्त रहात असल्यामुळे अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही तिचे पती सामनेवाला क्र.१ यांचेवरच येते. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे तिच्या माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. तसेच, तिच्याकडे चरितार्थासाठी कोणतेही साधन नाही. त्यामुळे, अर्जदार हिला भविष्यात मिळणाऱ्या पोटगीच्या तुटपुंज्या मदतीतूनच स्वतःचा उदरनिर्वाह करावयाचा आहे.

१४. प्रस्तुतच्या दरम्यानची पोटगी मिळण्याच्या अर्जाचा विचार करताना प्रथमदर्शनी हे पाहणे गरजेचे आहे की, अर्जदारवर सामनेवाला यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे, ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली पाहिजे. अर्जदार हिच्या कथनानुसार सामनेवाला क्र.१ हा दारु पिऊन अर्जदाराला शारिरिक व मानसिक त्रास देत असे, माहेरहून हुंडा घेवून येण्याची मागणी करीत असत, तिची जाऊ तिला तू येथे राहू नकोस, असे टोमणे मारत असे. सासू सासरे तु हुंडा आण, नाहीतर तुला नांदू देणार नाही, तू कोर्टात गेलीस तर तुझ्या आई व भावास भोकसून जीवे मारेन अशी धमकी देत होते. तसेच अर्जदारच्या नणंदेचा मुलगा शुभम हा हातात चाकू घेऊन अर्जदारला धमकावत होता. मानसिक व शारिरीक त्रासाला कंटाळून अर्जदार ही माहेरी आल्याचे कथन केले आहे. अर्जदार ही कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय स्वतःहून घर सोडून निघून गेली हे दाखविण्यासाठी प्रथमदर्शनी पुरावा सामनेवाला यांनी अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे, अर्जदार ही कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय स्वतःहून सामनेवाला क्र.१ पासून वेगळी रहात आहे, ही बाब विश्वासार्ह वाटत नाही. त्यामुळे, अर्जदार हिची शपथेवर केलेली कथने व त्याचे पुष्ट्यर्थ सादर केलेला प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा पाहता अर्जदार हिचा सामनेवाला यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याची बाब प्रथमदर्शनी अर्जदार हिने सिध्द केलेली आहे.

१५. वर चर्चिल्याप्रमाणे पत्नीच्या उपजिवीकेची सोय करण्याची संपूर्ण

जबाबदारी ही भारतीय संस्कृतीनुसार तिच्या पतीवर असते. त्यामुळे, निश्चितच अर्जदारचे कथनानुसार अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळण्यास पात्र ठरते. दरम्यानची पोटगी ठरविण्याकरिता सामनेवाला क्र.१ यांचे उत्पन्नाचे साधन विचारात घेणे जरुरीचे आहे.

१६. सामनेवाला क्र.१ यांच्या कथनाप्रमाणे, अर्जदार ही स्वतःहून जाबदारापासून विभक्त माहेरी राहत आहे. कोणतेही संयुक्तिक कारण नसताना तिने जाबदाराचा त्याग केलेला आहे. परंतु, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार ही कोणताही कामधंदा करीत नसून तिची माहेरची परिस्थिती गरिबीची आहे. तिला उपजीविकेचे कोणतेही साधन नाही. याउलट, अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे सामनेवाला यांचे मौजे माहुली येथे स्वतःचे राहते घर आहे. सामनेवाला क्र.१ हा पुणे येथे मॉलमध्ये काम करतो व त्याला रु.२५,०००/– इतका पगार आहे.

१७. अर्जदार हिस प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सामनेवाला क्र.१ हा पुण्यासारख्या शहरात मॉलमध्ये काम करत आहे व रु.२५,०००/– इतका पगार आहे, असे अर्जदार हिने कथन केले आहे. मात्र त्याबाबत कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तसेच जाबदार क्र.१ ने त्यांचे म्हणण्यामध्ये तो पुणे येथे कापड दुकानात कामाला असलेबाबत कथन केले आहे. वरील बाबींचा सारासार विचार केला असता तो पुण्यासारख्या शहरात काम करीत आहे तर जाबदार क्र.१ याला कमीत कमी रोजचे रु.३००/– इतके उत्पन्न मिळत असावे असे गृहित धरले तरी मासिक ९ हजार रुपये सामनेवाला कमवत असावा ही बाबत सहज शक्य आहे. मूळ अर्जाचा अंतिम निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार असल्याने व अर्जदार हिला उपजिवीकेचे कोणतेही साधन नसल्याने दरम्यानची पोटगी व घरभाडे म्हणून अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/– केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावे असे निर्देश सामनेवाला क्र.१ यांना देणे संयुक्तिक व उचित वाटते.

१८. अर्जदार हिने सामनेवाला यांच्याकडून संरक्षणाची मागणी केलेली आहे.

परंतु, अर्जदारच्या कथनानुसार ती सामनेवाला यांच्यापासून विभक्त राहत आहे. सामनेवाला हे अर्जदार हिचे सध्या राहते त्याठिकाणी येऊन तिला त्रास देत आहेत, असे कथन अर्जदार हिने केलेले नाही. त्यामुळे, याक्षणी सामनेवाला यांचेविरुध्द अर्जदार हिला संरक्षण मंजूर करणे उचित वाटत नाही. त्यामुळे, अर्जदार हिची सदरची मागणी या घडीला पुराव्याअभावी मंजूर करता येणार नाही. सबब विचाराधीन बाब क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार दिपाली शैलेश फाळके हिस अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/– (तीन हजार मात्र) इतकी दरम्यानची पोटगी व घरभाडे सामनेवाला क्र.१ यांनी द्यावी.

३. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Digitally signed by MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Date: 2022.10.06 15:21:40 +0530

ठिकाण–विटा.
दिनांकः–०६.१०.२०२२

(मो.शारीक ए.यु.रहेमान)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | M.Sharique.A.U. Rahman, Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C. Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 06.10.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 06.10.2022 |
| Order uploaded on | :- | 06.10.2022. |